**रे. दि. मु. क्र. २४४/२०२१ मधील निशाणी क्र. ५ वरील आदेश**
**(तुकाराम व इतर  वि. समाधान व इतर)**
**(CNR-MHSN08-001431-2021)**

वादींनी प्रस्तुतचा अर्ज दावेचा अंतिम न्यायनिवाडा होईपावेतो प्रतिवादी क्र. १ ते ५ व प्रतिवादी क्र. ११ यांनी दावा मिळकतीमध्ये तहसीलदार, जत यांचेकडील क्र.जमीन/मामलेदार कोर्ट ॲक्ट ०५/एस.आर. १२/२०२० चे प्रकरणी दि. ०८/१०/२०२० रोजी केलेल्या आदेशाचा गैरफायदा घेऊन नव्याने रस्ता करू नये व मुरूम टाकून रस्ता कायमस्वरूपी पक्का करू नये आणि वादींच्या असलेल्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये अशी तूर्तातूर्त मनाईची ताकीद त्यांच्याविरुद्ध मिळावी याकरिता दाखल केला आहे.

२) **वादींचे अर्जातील कथने संक्षिप्ततेत खालीलप्रमाणे:-**

**दावा मिळकतः-**

मौजे रेवनाळ, ता. जत, जि. सांगली येथील मिळकत गट क्र. ८०७ क्षेत्र हे. ४=१४ आर पोट खराब हे. ०=०६ आर आकार रू. २.३७ पै. ची मिळकत यासी चतुःसीमा-

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | - | रंगा भगवान पुजारी |
| पश्चिमेस | - | हणमंत तुकाराम ओलेकर |
| दक्षिणेस | - | आशाराम नामदेव वाघमोडे |
| उत्तरेस | - | यशवंत गोपाळा वाघमोडे |

येणेप्रमाणे चतु:सीमेतील मिळकतीत गावापासून ते तलावाकडे व लक्ष्मी मंदिराकडे जाणाऱ्या नकाशातील असणाऱ्या रस्त्याची असणारी मिळकत वगळून

उर्वरित राहणारी मिळकत त्यातील तदंगभूत वस्तूंसह व इझमेंटरी हक्कांसह सर्व. (पुनरुल्लेख टाळण्याकरिता येथून पुढे सदर मिळकतीस संक्षिप्ततेत 'दावा मिळकत' असे संबोधले आहे.)

३) वादींचे पुढील कथन असे की, दावा मिळकत वादींच्या मालकी वहिवाटीची आहे. वादी हे दावा मिळकत त्यांचे कुटुंबांकरिता समाईकात वहिवाटून खातात. तसेच मौजे रेवनाळ गावातून म्हणजेच गट क्र. ७१६ ते ७४७ व पुढे ८१८, ८१७, ८१६, ८०७, ८१२, ८११ ते तलावाकडे व मंदिराकडे अशा मिळकतींमधून जाणाऱ्या नकाशातील सरकारी रस्ता अस्तित्वात होता व आहे. सदर रस्त्याच्या आजूबाजूचे शेतकरी, गावकरी पूर्वीपासून याच रस्त्यानेच पूर्वापर वहिवाट करीत आलेले होते व आहेत.

४) वादींचे पुढील कथन असे की, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. ६ ते १० यांचेविरूद्ध तहसीलदार, जत यांचे कोर्टात मामलतदार कोर्ट ॲक्ट कलम ५ प्रमाणे गट क्र. ८१७, ८१६, ८०७ मधील नकाशातील रस्ता अडविला आहे व तो खुला करून देणेबाबत अर्ज केलेला होता. त्याबाबत प्रतिवादी क्र. ६ ते १० यांनी रीतसर हजर होऊन म्हणणे दिले होते. वादींच्या दावा मिळकतीमधून कधीही वहिवाटीचा रस्ता नव्हता व नाही व तसेच रस्ता अडविला नसल्याचे कथन केले आहे. त्याकामी वादींना नोटिसेस न देता तहसीलदार, जत यांनी वस्तुस्थितीचा पंचनामा न करता गट क्र. ८१७, ८१६, ८०७ मध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी अडथळा केलेचे गृहीत धरून वहिवाटीच्या गट क्र. ८१७, ८१६ व ८०७ या मिळकतीमधील अडथळा दूर करण्याबाबत दि. ०८.१०.२०२०

रोजी आदेश केलेला आहे. याउलट प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी तलावाकडे जाणारा रस्ता अडविला आहे. तो खुला करावा म्हणून विनंती केली असता त्यावर चिडून जाऊन प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी रस्ता अडविल्याचे कथन करून तहसीलदार, जत यांचेकडे अर्ज केला. त्याकामी वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. ६ ते १० यांनी म्हणणे दिले आहे. तसेच तहसीलदार यांचे अर्जाकामी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी वादी क्र. २ यास अर्जात सामील केले नाही अथवा त्यास कळू न देता महसूल अधिकारी यांचेशी संगनमत करून दिशाभूल करून प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे वतीने त्यांची मागणी नसताना तहसीलदार जत यांनी दि. ०८.१०.२०२० रोजी निकाल केलेला आहे. त्याचा गैरफायदा घेऊन नकाशातील रस्त्याची वहिवाट असताना प्रतिवादी क्र. १ ते ५ हे सदर नकाशातील रस्ता सोडून दांडगाव्याने वादीच्या दावा कलम १ मधील मिळकतीमधून तहसीलदार, जत यांचे झालेल्या आदेशाचा गैरफायदा घेऊन वादींच्या जमिनीत घुसून त्यांना पाहिजे तसा रस्ता करण्याच्या हेतूने, कायमस्वरूपी नकाशातील असलेल्या रस्त्यास बगल देऊन, वादीच्या अपरोक्ष मुरूम टाकून वादींच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेऊन रस्ता करण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. त्याद्वारे दावा मिळकतीमध्ये येऊन दांडगाव्याने हवा तसा नसलेला रस्ता कायमस्वरूपी पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रतिवादी क्र. १ ते ५ हे दांडगावखोर इसम असून राजकीय दृष्ट्या प्रबळ आहेत. याउलट वादी हे गरीब व मनुष्यबळ नसलेले इसम आहेत.

५) वादींचे पुढील कथन असे की, तेवढ्यावरच न थांबता प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी मे. तहसीलदार, जत यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता पोलीस मदत तहसीलदार, जत यांच्या आदेशान्वये मिळविली व वादी क्र. २ यांना

तहसीलदार, जत यांचे अर्जात सामील न करता त्यांचे मिळकतीमधून रस्त्याचा निकाल दिला आहे. तसेच दि. ०५.०७.२०२१ रोजी तहसीलदार, जत यांच्या आदेशाचा गैरअर्थ काढून तहसीलदार, जत यांचे निकालाकामी पक्षकार नसताना वादी क्र. २ यांना सी.आर.पी.सी. कलम १४९ ची नोटीस देऊन पोलीस बळावर वादींच्या दावा मिळकतीमध्ये येऊन जे.सी.बी. ने वादींच्या जमिनीतून नकाशातील रस्त्यास बगल देऊन नवीन रस्त्याची वहिवाट दाखविण्यासाठी जे.सी.बी. ने जमीन उकरून पिकाचे, जमिनीचे नुकसान केले आहे. त्यावेळी कोणताही पंचनामा केलेला नाही. अथवा स्थळ पंचनामा केलेला नाही. अशाप्रकारे नवीन रस्ता दावा मिळकतीमधून मधोमध झाल्यास जमिनीची छकले होऊन वादींचे पैशाचे रूपाने न भरून येणारे नुकसान होणार आहे. वादींच्या असलेल्या मालकी हक्कावर गदा येऊन वादींच्या जमिनीमध्ये दोन रस्ते होणार आहेत.

६) वादींचे पुढील कथन असे की, तहसीलदार ,जत यांनी नकाशातील रस्ता असताना व नवीन रस्ता देणेची गरज नसतानाही प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्या हट्टाखातर त्यांची अर्जात मागणी नसताना निकाल दिलेला आहे. तो निकाल रद्दबातल होण्यास पात्र आहे. वादीच्या जमिनीतून कधीही वहिवाटीचा रस्ता नव्हता व नाही. प्रतिवादी क्र. १ ते ५ हे नव्याने रस्ता करू पाहत आहेत. सदरची बाब बेकायदेशीर असून ती वादींवर अन्यायकारक आहे. वादींच्या जमिनीमध्ये नकाशातील रस्ता पूर्वीपासून अस्तित्वात असताना वादींच्या दावा मिळकतीमध्ये नव्याने रस्ता करू पाहत आहेत. त्यावर न थांबता वादींच्या जमिनीमध्ये मुरूम टाकून रस्ता कायमस्वरूपी दांडगाव्याने पक्का करण्याच्या इराद्याने धडपड करू लागले आहेत. तसेच प्रतिवादी क्र. १ ते ५ हे प्रतिवादी क्र. ११ यांना तहसीलदार,

जत यांनी दिलेल्या निकालाप्रमाणे रस्ता करा असा दबाव आणीत आहेत. तसे प्रतिवादी क्र. ११ यास कायद्याने करता येणार नाही. तसेच सदर तहसीलदार, जत यांच्या आदेशाचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी क्र. ११ यांनी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्या दबावामुळे वादीच्या दावा मिळकतीमध्ये कोणताही नवीन रस्ता करण्याच्या हेतूने दावा मिळकतीमध्ये येऊ नये म्हणून वादींची मागणी आहे. त्याकरिता वादींना प्रतिवादी क्र. १ ते ५ व प्रतिवादी क्र. ११ याच्याविरुद्ध मिळकतीमध्ये येऊन नव्याने रस्ता करू नये व वादीच्या दावा मिळकतीमध्ये येऊन जमीन उकरून, मुरूम टाकून नुकसान करू नये व डांबरीकरण व पक्का रस्ता करू नये व वादीच्या दावा मिळकतीच्या वहिवाटीस हरकत, अडथळा करू नये म्हणून प्रस्तुतचा निरंतर ताकिदीचा दावा करणे भाग पाडले आहे. तसेच तहसीलदार, जत यांनी दि. ०८.१०.२०२० रोजी दिलेला आदेश वादीवर बंधनकारक नाही व तो रद्दबातल आहे असे ज्ञापित होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

७) वादींचे पुढील कथन असे की, तहसीलदार, जत यांचेकडील प्रकरणात वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. ६ ते १० यांनी त्यांचे म्हणण्यात प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी नकाशातील रस्ता त्याचे गट क्र. ८०८, ८०९, ८१० व पुढे शेवटी तलावाकडील ७१८ पर्यंत गेलेला रस्ता बंद केल्यामुळे व खुला करण्याबाबत विनंती केली असता तहसीलदार, जत यांनी त्याचे निकालाकामी मे. न्यायालयास अधिकार नसल्याचे कथन करून वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. ६ ते १० यांची मागणी फेटाळली आहे. सदर रस्ता खुला करण्याचे अधिकार दिवाणी न्यायालयास असल्याचे कथन आहे. त्यामुळेही तहसीलदार, जत यांचा निकाल त्या कारणाने रद्दबातल आहे असे ज्ञापित होऊन मिळून सदरचा नकाशातील रस्ता खुला करण्याबाबत व सदर

रस्त्याच्या वहिवाटीस हरकत व अडथळा स्वतः अगर अन्य इसमामार्फत कर नये म्हणूनही केला आहे.

८) वादींचे पुढील कथन असे की, तहसीलदार, जत यांनी दि. ०८.१०.२०२० रोजी रस्त्याबाबत आदेश केला व त्या निकालाप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ५ हे दावा मिळकतीमध्ये येऊन नवीन रस्ता करणार, मुरूम टाकणार अशी धमकी देऊन दावा मिळकतीमध्ये येऊन जमीन उकरून रातोरात मुरुम टाकण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. तसेच प्रतिवादी क्र. १ ते ५ हे प्रतिवादी क्र. ११ यांचेवर दबाव टाकून दावा मिळकतीमध्ये कायमस्वरूपी रस्ता करण्याचा प्रयत्न करू लागले असून तसे गावात गेल्या १५ दिवसापासून बोलून दाखवू लागले आहेत व त्या हेतूने हालचाल करू लागले आहेत.

९) वादींचे पुढील कथन असे की, दावेची अंतिम चौकशी होण्यास बराच कालावधी लागणार आहे. प्रतिवादी क्र. १ ते ५ व ११ यांनी वादीच्या दावा मिळकतीमध्ये अंगबळाचे जोरावर तहसीलदार, जत यांच्या आदेशाचा गैरफायदा घेऊन नकाशातील अस्तित्वात असलेल्या रस्त्यास बगल देऊन नव्याने कोणतेही मुरूमीकरण करून पक्का रस्ता करू नये म्हणून निरंतर ताकिदीची मागणी केलेली आहे. तसेच तहसीलदार, जत यांचा दि. ०८.१०.२०२० चा आदेश रद्दबातल असे जाहीर होऊन मिळण्यासाठी दावा केलेला आहे व प्रतिवादी क्र. १ ते ५ व प्रतिवादी क्र. ११ यांचे विरुद्ध प्रस्तुतचा तूर्तातूर्त ताकीद होण्यासाठी अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. तहसीलदार, जत यांनी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्या अर्जाकामी मागणी नसताना आदेश केलेला आहे. अशाप्रकारे वादींना प्रथमदर्शनी प्रकरण आहे.

प्रतिवादी क्र. १ ते ५ व ११ यांचेविरोधात तूर्तातूर्त ताकीद न दिल्यास वादींच्या दावा मिळकतीचे पैशाच्या रूपाने न भरून येणारे नुकसान होणार आहे. वादींना सामाईक दावा मिळकत वहिवाटणे मुश्कील होणार आहे. ग्रेटर हार्डशिप वादींचीच होणार आहे. याउलट प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून प्रतिवादींना दावेचे अंतिम निकाल होईपावेतो तूर्तातूर्त ताकीद व्हावी. तसे न झाल्यास वादीवर अन्याय होऊन गुंतागुंत होऊन व दावेची चौकशी लांबून निकालास बराच दिनावधी लागणार आहे. तसेच वादींना दावा मिळकत कसणे अवघड होऊन जमिनीमध्ये सुधारणा करणे अशक्य होणार आहे. वादीच्या दावेचे कोणतेही प्रयोजन उरणार नाही. सबब, वादींनी विनंती केल्याप्रमाणे तूर्तातूर्त मनाईचा आदेश प्रस्तुत प्रतिवादींविरुद्ध पारित करावा अशी विनंती केली आहे.

**<u>प्रतिवादी क्र. १ ते ५ ची प्रतिकथने संक्षिप्ततेत खालीलप्रमाणे–</u>**

१०) प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी निशाणी क्र. ३८ कडे दाव्यास कैफियत व प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करून वादींची सर्व कथने नाकारली आहेत. सत्यवस्तुस्थितीदाखल म्हणून दिलेल्या म्हणण्यात त्यांनी अशी प्रतिकथने केली आहेत की, वादींनी दाव्यात कथन केलेल्या रस्त्याशी प्रतिवादींचा काडीमात्र संबंध नाही. सदरचा रस्ता हा पूर्वी पासून नकाशामधील शासकीय रस्ता असून सदरच्या रस्त्याचे मुरूमीकरण हे प्रशासनाच्या स्तरावर झाले आहे. प्रस्तुत प्रतिवादींचा व रस्त्याचा काहीही संबंध नाही. प्रतिवादी हे इतर लोकांचे बरोबर वहिवाट करतात. इतकाच काय तो संबंध आहे. वादीचा दावा हा अतिक्रमणाचा आहे. अतिक्रमण ज्या लोकांनी केले त्यांना या दाव्यात पक्षकार करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.

१ ते ५ यांना या दाव्यातून कमी करण्यात यावे.

११) प्रस्तुत प्रतिवादी पुढे असे प्रतिकथन करतात की, सदर गटामध्ये वादींना मालकी आहे किंवा रस्त्याकडेलाच वादीची जमीन आहे हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केला नाही. चतुःसीमा या सर्व गटाच्या क्षेत्राच्या दिलेल्या आहेत. सदर गटामध्ये इतरही हिस्सेदार आहेत. त्यांच्या मालकीचे क्षेत्र ७/१२ उताऱ्यामध्ये दिसून येते. त्यांना याकामी आवश्यक पक्षकार करणे आवश्यक होते. सदर गटातील इतर सहहिस्सेदारांना याकामी पक्षकार केले नसल्याने सदर दाव्यास नॉन जाईंडर ऑफ नेसेसरीज पार्टीची बाधा येते. त्यामुळे वादींचा दावा कायद्याने चालू शकत नाही. तो फेटाळण्यात यावा.

१२) प्रस्तुत प्रतिवादी पुढे असे प्रतिकथन करतात की, दावा कलम १ मध्ये नमूद शेत मिळकतीचा उतारा पाहता त्यामध्ये वादी क्र. २ यांचे नाव दिसून येत नाही. त्यामुळे वादींच्या जमिनीमधून रस्ता होता. वादी क्र. १ यांचे नाव वाद मिळकतीमध्ये आहे. मात्र त्यांची व इतर हिस्सेदारांची एकत्रितरीत्या समाईकात जमीन दिसून येते. त्यामुळे इतर हिस्सेदारांनी कोणतीही हरकत केली नाही. मात्र वादींनी राजकीय लोकांच्या सांगण्यावरून खोटा व बनावट कथनाच्या आधारे दावा दाखल केला आहे. गट क्र. ८१७, १९६ व ८०७ मधून जाणारा शासकीय रस्ता अडविल्याबाबत मामलतदार कोर्ट ॲक्ट मधील तरतुदीप्रमाणे खुला करून मिळण्याबाबत कलम ५ खाली तहसीलदार, जत यांचेकडे अर्ज केला होता. त्या अर्जाचा गुणदोषावर न्यायनिर्णय होऊन ज्या शेतकऱ्यांनी बेकायदेशीर रस्ता आडवलेला होता त्याची प्रत्यक्ष पाहणी होऊन मंजूर रस्ता करण्याचा कोणताही हक्क व अधिकार प्रतिवादी

यांना नाही. मात्र वादी व वादीसारख्या इतर शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाणे येणे करता, वहाणे आणणेकरिता दुसरा अस्तित्वात रस्ता नसल्याने ज्या ठिकाणी ओघळ पडल्या होत्या, तसेच ज्या ठिकाणी पावसाच्या पाण्याने रस्ता धुवून गेला होता आणि ज्या ठिकाणी काही शेतकऱ्यांनी रस्त्यावर अतिक्रमण केले होते या बाबी प्रत्यक्ष तहसीलदार, जत यांनी जागेवरील रस्त्याची पाहणी करून त्यांनी रस्ता केला आहे. रस्त्यावरील मुरूमीकरण हे शासकीय अधिकारी यांचे पूर्व परवानगीनेच केले आहे. प्रतिवादींनी कधीही शासकीय अधिकारी यांचेशी संगनमत करून अतिक्रमण रस्ता केला नाही. वादी म्हणतात त्या प्रमाणे वादीच्या जमिनीतून प्रतिवादींनी अतिक्रमण करून रस्ता करण्याचे कारणच नाही.

१३) प्रस्तुत प्रतिवादी पुढे असे प्रतिकथन करतात की, वादी क्र. २ यांनी रस्ता अडविलेला नव्हता म्हणूनच त्यांना तहसीलदार, जत यांचेकडील मामलतदार कोर्ट ॲक्ट मधील तरतुदीप्रमाणे केलेल्या अर्जात सामील केले नव्हते. ज्या शेतकऱ्यांनी अतिक्रमण केले होते त्यांनाच पक्षकार केले होते. वादींनी प्रतिवादींना नकाशाप्रमाणे रस्ता करा म्हणून सांगण्याचा प्रश्नच येत नाही. सदरचा रस्ता हा शासनाचा असून तो फार पूर्वीपासून अस्तित्वात आहे. रस्ता मुरूमीकरण करणेचा अधिकार प्रतिवादी यांना नाही. तो भाग प्रशासनाचा आहे. प्रतिवादींनी तहसीलदार, जत यांचेकडे कधीही नवीन रस्त्याची मागणी केली नाही. त्यामुळे वादी हे मे. न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सदरचा रस्ता हा तहसीलदार, जत यांनी स्वतः प्रत्यक्ष जागेवर येऊन अतिक्रमण काढून रस्ता खुला करून दिला आहे. रस्ता खुला करून देण्याच्या आदेशाविरुद्ध वादींनी वरिष्ठ कोर्टात दाद मागितलेली नाही. तसेच प्रशासकीय आदेशाने रस्ता झाला असल्यास त्यांना

याकामी पक्षकार करणे आवश्यक आहे. मात्र प्रशासनाला पक्षकार न करता त्याच आदेशाने झालेल्या कामास त्यांचे अपरोक्ष दावा दाखल करून दाद मागता येणार नाही.

१४) प्रस्तुत प्रतिवादी पुढे असे प्रतिकथन करतात की, तहसीलदार, जत यांचेसमोर दाखल असलेल्या अर्जाच्या अधिकाराबाबत मे. न्यायालयात ऊहापोह करता येणार नाही. तर त्या विरुद्ध वरिष्ठांकडे दाद मागणे अपेक्षीत होते. तसे न करता नकाशातील रस्ता गट क्र. ८०८, ८०९ व ८१० व पुढे शेवटी तलावाकडे ७१८ कडे जाणारा रस्ता करण्याबाबत वादी यांनी विनंती केली व ती तहसीलदार यांनी फेटाळली असे केलेले कथन खोटे व लबाडीचे आहे. त्याबाबत वादींनी याकामी कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केला नाही. वादींची मागणी अत्यंत चुकीची व बेकायदेशीर अशी आहे. एका बाजूस अतिक्रमण करून रस्ता केल्याची मागणी व दुसऱ्या बाजूस वादींच्या मालकीच्या शेत मिळकती मधील वहिवाटीस हरकत अडथळा करू नये अशी विरोधाभासाची मागणी वादी यांनी केली आहे ती चुकीची आहे. तहसीलदार, जत यांच्या आदेशाप्रमाणे रस्ता केला असल्याने त्यांना याकामी पक्षकार करणे आवश्यक होते. मात्र त्यांना पक्षकार न करता वादीच्या शेतातून अतिक्रमण करून रस्ता केला म्हणून दाद या मे. न्यायालयात मागता येणार नाही. तहसीलदार, जत यांनी दिलेल्या आदेशाविरुद्ध अपील/रीव्हीजन दाखल करून महसुल विभागाकडे दाद मागणे अपेक्षित आहे. त्यामुळे याचाही कारणाने वादीचा दावा फेटाळण्यास पात्र आहे.

१५) प्रस्तुत प्रतिवादी पुढे असे प्रतिकथन करतात की, सकृतदर्शनी प्रकरण वादींचे लाभात नाही. बॅलन्स ऑफ कन्व्हीनियन्स वादींच्या वतीने नाही. वादींच्या

शेत मिळकतीमध्ये अतिक्रमण करून रस्ता केला असल्याने त्याविरुद्ध मामलतदार कोर्ट ॲक्ट मधील तरतुदी प्रमाणे महसूल विभागाकडे दाद मागणे अपेक्षित आहे. वादी म्हणतात तो रस्ता प्रतिवादींच्या मालकीचा नाही. प्रतिवादी सारखे अनेक शेतकरी, ओलेकर वस्तीवरील लोक, तसेच माने वस्तीवरील लोक या रस्त्याचा गेल्या ७० ते ८० वर्षांपासून वहिवाट करतात. त्यामुळे सदरचा रस्ता वादींच्या मागणीप्रमाणे अडविल्यास प्रतिवादी व इतर शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होणार असून त्यांना त्यांच्या न्याय हक्कापासून वंचित रहावे लागणार आहे. मात्र वादी मागतात त्या प्रमाणे मनाई न दिल्यास वादींचे काहीही नुकसान होणार नाही. त्यामुळे वादींचा तूर्तातूर्त मनाईचा अर्ज फेटाळण्यात यावा व वादींनी राजकीय लोकांच्या सांगण्यावरून सदरचा खोटा दावा दाखल करून प्रतिवादींना नाहक त्रास दिला म्हणून वादींना प्रत्येक प्रतिवादींना कॉम्पॅनसेटरी कॉस्ट म्हणून रक्कम रू. १०,०००/– मात्र अदा करण्याबाबत आदेश व्हावा अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादींतर्फे करण्यात आलेली आहे.

**<u>प्रतिवादी क्र. ११ यांची प्रतिकथने संक्षिप्ततेत खालीलप्रमाणे–</u>**

१६) प्रतिवादी क्र. ११ यांना दावेचे समन्स व प्रस्तुत अर्जाची नोटीस दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम १६ अन्वये दि. २४/१२/२०२१ रोजी बजावणी होऊनही ते दावेचे कामी हजर राहीले नाहीत. सबब दि. ०७/०४/२०२२ रोजीचे निशाणी क्र. १ वर पारित आदेशान्वये दावेचे काम प्रतिवादी क्र. ११ विरुद्ध एकतर्फा चालले आहे.

१७) वादींतर्फे विधिज्ञ श्री. ए. ए. निटवे आणि प्रस्तुत प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. ए. बी. दुधाळ यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज, दावा आणि कैफियत

विचारात घेतली. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. सर्वांचा सारासार विचार करून खालील प्रश्नबिंदू माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील माझे निष्कर्ष सविस्तर कारणमिमांसेसह मी पुढीलप्रमाणे नमूद केले आहेत.

| अ. क्र. | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींना सकृतदर्शनी प्रकरण आहे काय? | **होकारार्थी** |
| २. | न्यायाचा समतोल वादींचे बाजूने झुकणारा आहे काय? | **होकारार्थी** |
| ३. | अर्ज नामंजूर केल्यास वादींची अपरिमित हानी संभवते काय? | **होकारार्थी** |
| ४. | काय आदेश? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## * कारणमिमांसा *

**प्रश्नबिंदू क्र. १ ते ४ बाबत–**

१८) प्रश्नबिंदू क्र. १ ते ४ हे एकमेकांशी संलग्न असल्याने व त्यांच्या अनुषंगाने अभिलेखावर दाखल कागदोपत्री पुरावा देखील एकमेकांशी संबंधित असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रश्नबिंदूंच्या कारणमिमांसेचे विवेचन एकत्रितपणे केले आहे.

१९) वादींनी त्याचे वाद कथनांची सकृतदर्शनी पृष्टी करण्यासाठी यादी निशाणी क्र. ३ सोबत दाखल केलेल्या खाली नमूद कागदोपत्री पुराव्यांवर भिस्त

ठेवली आहे.

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | मौजे रेवनाळ, ता. जत, जि. सांगली येथील गट क्र. ८०७ चे ७/१२ उताऱ्याची सहीशिक्क्याची प्रत. | ०८.०७.२०२१ |
| २. | मौजे रेवनाळ, ता. जत, जि. सांगली येथील गट क्र. ८०९, ८१०, ८११, ८१६, ८१७ आणि ७९३ च्या ७/१२ उताऱ्यांची सहीशिक्क्याच्या प्रती. | ०९.०९.२०२१, १३.०९.२०२१, १८.०८.२०२१, २४.०८.२०२१ |
| ३. | प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी तहसीलदार, जत यांचेकडे दिलेल्या अर्जाची सहीशिक्क्याची प्रत | १५.०५.२०२१ |
| | प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी तहसीलदार, जत यांचेकडे दिलेल्या अर्जासोबत दिलेल्या रेवनाळ गट नकाशाची सहीशिक्क्याची | १९.०७.२०२१ |
| ११. | तहसीलदार, जत यांचेकडे पोलीस पाटील, रेवनाळ यांनी दिलेल्या अर्जाची सहीशिक्क्याची प्रत | ३०.०५.२०२० |
| १२. | तहसीलदार, जत यांचेकडे सरपंच, रेवनाळ यांनी दिलेल्या अर्जाची सहीशिक्क्याची प्रत | ३०.०५.२०२० |
| १३. | प्रतिवादी क्र. ७ विजय आप्पासाहेब पुजारी तर्फे वडील आबासाहेब मारुती पुजारी यांनी दिलेल्या अर्जाची सहीशिक्क्याची प्रत | ०१.०६.२०२० |

| | | |
|---|---|---|
| १४. | तहसीलदार, जत यांनी प्रकरण क्र. जमीन/मामलेदार कोर्ट अॅक्ट ०५/एस.आर./१२/२०२० चे चौकशी काढलेल्या सुनावणीचे नोटिसीची सहीशिक्क्याची प्रत | ३०.०६.२०२० |
| १५. | वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. ६ ते १० यांनी तहसीलदार, जत यांचेसमोरील अर्जास दाखल केलेल्या म्हणणेची सहीशिक्क्याची प्रत | २०.०७.२०२० |
| १६ | वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. ६ ते १० यांनी तहसीलदार, जत यांचेकडे दिलेल्या अर्जासोबत दिलेल्या रेवनाळ गट नकाशाची सहीशिक्क्याची प्रत | १९.०७.२०२० |
| १७. | तहसीलदार, जत यांनी यांनी प्रकरण क्र. जमीन /मामलेदार कोर्ट अॅक्ट ०५/एस.आर./१२/२०२० चे कामी स्थळ पाहणीकरिता काढलेल्या नोटिसीची सहीशिक्क्याची प्रत | ११.०८.२०२० |
| १८. | तहसीलदार, जत यांचेकडील प्रकरण क्र. जमीन /मामलेदार कोर्ट अॅक्ट ०५/एस.आर./१२/२०२० चे कामी केलेल्या स्थळ पाहणी पंचनाम्याची सहीशिक्क्याची प्रत | १९.०८.२०२० |
| १९. | तहसीलदार, जत यांचेकडील प्रकरण क्र. जमीन /मामलेदार कोर्ट अॅक्ट ०५/एस.आर./१२/२०२० चे कामातील रोजनामेची सहीशिक्क्याची प्रत | १९.०७.२०२१ |

| | | |
|---|---|---|
| २०. | तहसीलदार, जत यांनी दिलेल्या मामलतदार कोर्ट ॲक्ट ०५/एस.आर./१२/२०२० चे कामी दिलेल्या निकालाची सहीशिक्क्याची प्रत | ०८.१०.२०२० |
| २१. | तहसीलदार, जत यांनी दिलेल्या मामलतदार कोर्ट ॲक्ट ०५/एस.आर./१२/२०२० दि. ८.१०.२०२० च्या निकालाचे समजची सहीशिक्क्याची प्रत | १२.०९.२०२१ |
| २२. | जत पोलीस ठाणे कडून जा. क्र. ११४३/२०२१ क्र. पक. १४९ प्रमाणे आलेली नोटीसची सहीशिक्क्याची प्रत | ०६.०७.२०२१ |

२०) याउलट प्रतिवादींतर्फे त्यांचे प्रतिकथनांचे पुष्ट्यर्थ यादी निशाणी क्र. ४४ सोबत दाखल केलेल्या खाली नमूद कागदोपत्री पुराव्यांवर भिस्त ठेवली आहे.

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | दावा मिळकतीची सद्यःस्थितीतील छायाचित्रे | १३.०४.२०२२ |
| २. | सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज यांचेकडील आदेशाची झेरॉक्स प्रत | १३.१२.२०२१ |
| ३. | ग्रामपंचायत, रेवनाळ यांचेकडील रस्त्याची नोंद असल्याबाबत नमुना क्र. २३ रस्त्याचे नोंदवहीची झेरॉक्स प्रत | १३.०४.२०२२ |
| ४. | तहसीलदार, जत यांचेकडील मुरूमीकरणेसाठीचा गौणखनिजाचे परवान्याची झेरॉक्स प्रत | ०५.०७.२०२१ |

| | | |
|---|---|---|
| ५. | उपविभागीय अधिकारी, जत यांचेकडील रिव्हीजन क्र. २२७/२०२० मधील प्रतिवादी क्र. ८ यांनी प्रतिवादी क्र. १ ते ५ व अन्य प्रतिवादींविरुद्ध झालेल्या आदेशाची झेरॉक्स प्रत | ११.०३.२०२२ |

**वादींतर्फे विधिज्ञांनी सादर केलेला युक्तिवाद–**

२१) वादीतर्फे विधिज्ञ श्री. ए. ए. निटवे यांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकत ही वादी व त्यांचे कुटुंबियांचे मालकीची मिळकत आहे. वादींनी दावा मिळकत ही नकाशाप्रमाणे असलेले रस्त्याचे क्षेत्र वगळून वर्णन केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी तहसीलदार, जत यांचेसमोर दाखल केलेला अर्ज हा मामलतदार कोर्ट ॲक्टचे कलम ५ प्रमाणे नकाशातील रस्त्यावर असणारा अडथळा दूर करून मिळणेबाबत सादर केला होता. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी रस्त्यावरील अडथळा दूर करून मिळणेची मागणी केली होती. नकाशाप्रमाणे दावा मिळकतीमधून रस्ता आहे याबाबत वादींची हरकत नाही. तथापि तहसीलदार, जत यांचा आदेश मात्र दावा मिळकतीमधील गाडी रस्त्यावरील हरकत अडथळा दूर करण्याबाबत करण्यात आला आहे. तहसीलदार, जत यांचा आदेश पाहिला असता तो नकाशामध्ये नमूद केलेल्या रस्त्याखेरीज दुसऱ्याच रस्त्यावरील अडथळा दूर करण्याबाबतचा असल्याचे सकृतदर्शनीच स्पष्ट होते. तहसीलदार, जत यांचा आदेश हा सुस्पष्ट नसून तो मोघम व संदिग्धतापूर्ण आहे. अडथळा दूर करून मागण्याचे अर्जाकामी केलेल्या स्थळपाहणी पंचनाम्यामध्येदेखील स्पष्टपणे नकाशाप्रमाणे रस्ता असल्याचे नमूद करण्यात आले आहे. असे असूनही तहसीलदार, जत यांनी अधिकार कक्षेबाहेर जाऊन नकाशात नमूद केलेल्या रस्त्याखेरीज वहिवाटीचा म्हणून रस्ता गृहीत धरून

त्यावरील अडथळा काढून देण्याचा आदेश पारित केला आहे. सदर आदेशाचा वापर करून प्रतिवादी क्र. १ ते ५ व ११ हे वादींचे दावा मिळकतीच्या मध्यभागातूनच रस्ता तयार करीत आहेत. अशा प्रकारे त्यांनी रस्ता तयार केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. प्रतिवादी क्र. ११ ग्रामपंचायत ही समन्स व नोटीस मिळूनही न्यायालयात हजर राहिलेली नाही. मात्र तिच्याकडून नकाशातील रस्ता सोडून दुसराच रस्ता नव्याने तयार करण्याचे प्रयत्न चालूच आहेत.

२२) त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी त्यांच्या कैफियत व म्हणण्यामधून कोणतीच सबळ हरकत वादींचे दाव्यास व प्रस्तुतचे अर्जास घेतलेली नाही. ते केवळ त्यांचा दावा मिळकतीतील रस्त्याशी कोणताच संबंध नाही असे प्रतिपादन करतात. मात्र दुसरीकडे वादीचे दाव्यास व प्रस्तुत अर्जास आव्हान देत आहेत. तसेच त्यांनीच तहसीलदार, जत यांचेकडे नकाशातील रस्त्यावरील अडथळा दूर होऊन मिळणेकामी अर्ज सादर केलेला आहे. त्यामुळे त्यांचा वाद रस्त्याशी काहीही संबंध नाही असे त्यांना म्हणता येणार नाही. अशा प्रकारे प्रतिवादी क्र. १ ते ५ हे दुटप्पीपणाची भूमिका घेऊन स्वतःचे हिताचे संरक्षण करणारी भूमिका गरजेनुसार बदलत आहेत. प्रतिवादी क्र. ११ देखील कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब केल्याखेरीज काम करीत आहेत. त्यांनी दावेचे कामी हजर राहून प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे कथनाप्रमाणे रस्त्याचे सुरू असलेले काम कायदेशीरदृष्ट्या वैध कसे आहे हे दर्शवून देण्याची तसदीदेखील घेतलेली नाही. या सर्व बाबींवरून वादींनी सकृतदर्शनी प्रकरण व न्यायाचा तराजू त्यांचे बाजूने असल्याचे दर्शविले असल्याने त्यांचे लाभात तूर्तातूर्त मनाईची ताकीद न दिल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे ही बाब स्वयंस्पष्ट आहे. अखेरीस त्यांनी वादींचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे असे प्रतिपादन केले.

**<u>प्रतिवादींतर्फे विधिज्ञांनी सादर केलेला युक्तिवाद–</u>**

२३) याउलट प्रतिवादी क्र. १ ते ५ तर्फे विधिज्ञ श्री. ए. बी. दुधाळ यांनी असा युक्तिवाद केला की, वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली मागणी व दाव्यामध्ये केलेली अंतिम मागणी ही एकसारखीच असल्याने वादींनी विनंती केल्याप्रमाणे तूर्तातूर्त मनाईचा आदेश पारित करता येणार नाही. प्रतिवादी क्र. १ ते ५ हे दावा मिळकतीमधून कोणताही रस्ता नव्याने निर्माण करत नसून ते शासनाचाच रस्ता तयार करीत आहेत. त्यामुळे वादींना शासनास पक्षकार करणे जरुरीचे आहे. त्यामुळे वादींचा दावा व प्रस्तुतचा अर्ज शासनास पक्षकार केलेखेरीज चालणेस पात्र नाही. त्याचबरोबर दावा मिळकतीतील रस्त्यावर मुरमीकरणाचे काम प्रत्यक्षात पूर्ण झालेले असल्यामुळे वादींनी विनंती केल्याप्रमाणे तूर्तातूर्त मनाईचा आदेश पारित करता येणार नाही. दावा मिळकतीमधील रस्ता हा शासनाचा रस्ता असल्याने त्याबाबत कोणतेही आदेश पारीत करण्याचे अधिकारक्षेत्र या न्यायालयास नाही. तसा निवाडा मा. पंजाब उच्च न्यायालयाने **ग्रामपंचायत वि. बुधा राम व ईतर, (२००३) १०३ पी. एल. आर. ५१८** या प्रकरणामध्ये दिलेला आहे. त्यामुळे कायद्याने वादींचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यास पात्र नाही असे प्रतिपादन त्यांनी केले.

**<u>प्रश्नबिंदूच्या अनुषंगाने नोंदविलेल्या निष्कर्षाबाबतचे न्यायालयाचे कारणमिमांसेचे मुद्दे–</u>**

२४) कारणमिमांसेस सुरूवात करण्यापूर्वी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादींनी केलेली तूर्तातूर्त मनाईची मागणी त्यांचे लाभात द्यावी अथवा न द्यावी ही बाब न्यायालयाच्या विवेकाधिकारात असणारी आहे. त्याकरिता वादींना सकृतदर्शनी प्रकरण आहे काय ? न्यायाचा समतोल त्यांचे बाजूने झुकतो काय? तसेच तूर्तातूर्त

ताकीद न दिल्यास वादींचे नुकसान संभवते काय ? हे पाहणेही तितकेच गरजेचे आहे.

२५) वादींनी प्रस्तुतचा दावा हा तहसीलदार, जत यांनी क्र. जमीन/मामलेदार कोर्ट ॲक्ट ०५/एस.आर./१२/२०२० चे कामी दि. ०८.१०.२०२० रोजी पारित केलेला आदेश चुकीचा व बेकायदेशीर असल्याचे जाहीर होऊन मिळणेसाठी आणि प्रतिवादी क्र. १ ते ५ आणि ११ यांनी सदर आदेशाप्रमाणे दावा मिळकतीमधून कोणताही पक्का रस्ता करू नये तसेच त्यांनी वादींचे दावा मिळकतीवरील कायदेशीर कब्जेवहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत व अडथळा करू नये अशी निरंतर मनाईची दाद मिळणेसाठी दाखल केला आहे. तसेच सदर दावेमध्ये प्रस्तुतचा अर्ज सादर करून वादींनी दावेच्या अंतिम निकालापावेतो प्रतिवादी क्र. १ ते ५ व ११ यांनी तहसीलदार, जत यांचे आदेशाप्रमाणे कोणताही रस्ता तयार करू नये व वादींचे दावा मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करू नये अशी तूर्तातूर्त ताकीद देणेची विनंती केली आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाचे निर्णयाकरिता वादींनी विनंती केल्याप्रमाणे तहसीलदार, जत यांनी वर नमूद केलेल्या प्रकरणात पारित केलेला आदेश सकृतदर्शनी चुकीचा असल्याचे व सदर आदेशाचा आधार घेऊन प्रतिवादी क्र. १ ते ५ व ११ हे दावा मिळकतीमधून नकाशातील रस्ता सोडून दुसराच रस्ता नव्याने निर्माण करीत असल्याचे सकृतदर्शनी दर्शवून दिले आहे काय हे पाहणे गरजेचे आहे.

२६) या पार्श्वभूमीवर उभय पक्षकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन व युक्तिवादाचा विचार केला असता सर्वप्रथम ही बाब नमूद करणे जरुरीचे आहे की, मामलतदार कोर्ट ॲक्ट कलम ५ अन्वये तहसीलदार यांना एखाद्या मिळकतीमध्ये कोणाही धारकाने कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब न करता पाण्याच्या

नैसर्गिक प्रवाहास अडथळा केला असेल व तशा अडथळ्यामुळे लगतच्या धारकांचे जमिनींचे नुकसान होत असेल असे दिसून आले तर तसा अडथळा दूर करून देण्यासाठी आदेशीत करण्याचे अधिकार क्षेत्र प्रदान केले आहे. सदरच्या अधिकार क्षेत्राबाबत वादी वा प्रतिवादी क्र. १ ते ५ व ११ यांनी कोणताच वाद उपस्थित केलेला नाही. त्यामुळे तहसीलदार, जत यांनी वर नमूद केल्याप्रमाणे क्र. क्र. जमीन/मामलतदार कोर्ट ॲक्ट ०५/एस.आर./१२/२०२० चे कामी पारित केलेला आदेश तसा अडथळा दूर करण्यासाठी आदेशीत केला आहे काय हे पाहणे जरुरीचे आहे. त्यादृष्टीने सकृतदर्शनी प्रकरण विचारात घेण्यासाठी सर्वप्रथम ही बाब विचारात घेणे जरुरीचे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी तहसीलदार, जत यांचेकडे दि. १५/०५/२०२० रोजी सादर केलेल्या अर्जामध्ये स्पष्टपणे असे नमूद केलेले आहे की, त्यांचे वस्तीकडे जाणारा रस्ता अस्तित्वात असून तो रस्ता **रेवनाळ ते कोसारी असा नकाशात व भूमी अभिलेख विभागात नोंद आहे.** तसेच सदरचा रस्ता शासकीय रस्ता असूनही त्या प्रकरणातील जाबदारांनी बेकायदेशीररीत्या आडवून ठेवला आहे. त्याचबरोबर प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी तहसीलदार, जत यांचेकडे सादर केलेल्या अर्जातील विनंतीचा विचार केला असता त्यांनी स्पष्टपणे अशी मागणी केली आहे की, **प्रतिवादी यांनी शासकीय रस्ता अडवून त्यावर अतिक्रमण करून लोकांना येणे–जाणेसाठी अडथळा केला आहे. ते अतिक्रमण काढून रस्ता खुला करून मिळावा.**

२७) सदरप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी तहसीलदार, जत यांचेकडे केलेल्या अर्जाचे विनंतीचा विषय विचार घेतला असता त्यांनी **नकाशात नमूद केल्याप्रमाणे असलेल्या रस्त्यावर केलेला अडथळा काढून मिळणेची विनंती केली असलेची बाब स्पष्ट होते.** त्याअनुषंगाने तहसीलदार, जत यांनी अर्जाचे चौकशीकामी केलेल्या स्थळपाहणी पंचनाम्यामध्ये काय वस्तुस्थिती अभिलेखावर आली आहे

याचाही विचार प्रस्तुत अर्जाचे निर्णयाकामी करणे जरुरीचे आहे. त्याअनुषंगाने तहसीलदार, जत यांचेकडील अर्जाचे चौकशीकामी दि. १९.०८.२०२० रोजी केलेल्या स्थळपाहणी पंचनाम्याचे प्रतीचे अवलोकन केले असता त्यामध्ये स्पष्टपणे असे नमूद केले आहे की,

> "प्रत्यक्ष वस्तुस्थिती पाहिली असता गट क्र. ८१८ चे उत्तर सरबांधापर्यंत नकाशाप्रमाणे रस्ता खुला असलेचे दिसून आले. पूढे गट क्र. ८१७ मध्ये पूर्वीचा वहिवाटीचा रस्ता बंद करून गट क्र. ८१६ पर्यंत सरळ काढून दिलेले आहे. पुढे गट क्र. ८१६ मध्ये नकाशामध्ये रस्ता अस्तित्वात आहे. परंतु यापूर्वी गट क्र. ८१६ मधून रस्तेची वहिवाट नसलेचे दिसून आले. पूढे गट क्र. ८०७ मधून वहिवाटीचा रस्ता अस्तित्वात असून गट क्र. ८०८, ८०९ व ८११ यांचे दरम्यान असलेल्या सरबांधावरून वहिवाट सुरू असलेचे दिसून आले. गट क्र. ८०९ व ८१० च्या सरबांधाने असलेला रस्ता संबंधीत शेतमालक यांचा स्वतःचा खाजगी असलेचे सांगितले. तसेच नकाशाचे अवलोकन केले असता गट क्र. ८१६ चे नैऋत्य कोपऱ्यातून गट क्र. ८११ च्या दक्षिण भागातून नकाशामध्ये रस्ता आहे. परंतु सदर गटात आज रोजी रस्त्याची वहिवाट आढळून आली नाही. गट क्र. ८०८, ८०९, ८१० व ७९४, ७९५, ७९६, ७९७ व ७९८ मधून नकाशामध्ये रस्ता आहे. परंतु सदर रस्त्याची वहिवाट मागील ४० ते ४५ वर्षांपासून बंद आहे."

२८) सदर स्थळपाहणी पंचनाम्याचे अनुषंगाने चौकशी करून तहसीलदार, जत यांनी वर नमूद अर्जाचे कामी पारित केलेल्या अंतिम आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी स्थळपाहणी पंचनाम्यातील वस्तुस्थितीच त्यांचे

आदेशामध्ये पुन्हा उद्धृत करून त्यांचे कारणमिमांसेसाठी पुढे असे नमूद केले आहे की,

> "जाबदार यांनी गट क्र. ८०८, ८०९, ८१०, ७९४, ७९५, ७९६, ७९७ व ७९८ मधील जुना रस्ता खुला करणेबाबत मागणी केली आहे. परंतु सदरची मागणी पूर्ण करता येणार नाही कारण ४० ते ४५ वर्षांपूर्वीचा बंद रस्ता खुला करणेबाबतचे अधिकार या न्यायालयास नाही. तरी याबाबत सक्षम न्यायालयातून रस्त्याबाबत दाद मागणे गरजेचे आहे "

> "अर्जदार यांनी मागणी केलेला यापूर्वी चालू असलेला बैलगाडी रस्ता गट क्र. ८११ च्या जमिनीमध्ये जाणेयेणेसाठी गट क्र. ८०७, ८१६ व ८१७ च्या जमीन मालकांनी नांगरणी करून रस्ता आडविले असलेबाबत प्रत्यक्ष पाहणीवरून व उपलब्ध अभिलेखावरून माझी खात्री झाल्याने व शेतकरी यांनी आडविलेला रस्ता खुला करून देणे विधीग्राह्य आहे."

२९) अशा प्रकारे कारणमिंमासा नमूद करून तहसीलदार, जत यांनी अंतिम आदेशामध्ये मौजे रेवनाळ येथील शेतजमीन गट क्र. ८०७, ८१६ व ८१७ मध्ये वहिवाटीचा बैलगाडी रस्ता त्यावरील केलेले अडथळे दूर करून तत्काळ खुला करणेत यावा असा आदेश पारित केलेला आहे.

३०) सदर आदेशाचा उपलब्ध कागदपत्रांचे पार्श्वभूमीवर विचार केला असता हेदेखील स्पष्टपणे नमूद करणे जरुरीचे आहे की, वादींनी कथन केल्याप्रमाणे गट क्र. ७९५, ७९६, ७९७, ७९८, ८०७, ८०८, ८०९, ८१०, ८१२, ८१६, ८१७,

८१८ आणि ८१९ चे गटांमधून गावनकाशामध्ये नमूद केल्याप्रमाणे शासकीय रस्ता असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. तसेच प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी सदर नकाशात नमूद केलेल्या शासकीय रस्त्यावरीलच अतिक्रमण काढून खुला करून मिळावा अशी विनंती त्यांचे अर्जात केली असल्याचे देखील दिसून येते. त्याचबरोबर वर नमूद केल्याप्रमाणे स्थळपाहणी पंचनाम्यामध्ये सदरचा शासकीय रस्ता पंचनाम्यात नमूद केल्याप्रमाणे धारकांनी अडथळा करून बंद केला असल्याने व वहिवाटीत नसल्याने ४० ते ४५ वर्षांपासून बंद असल्याचे व त्यामुळे तो खुला करून देण्याचे अधिकार क्षेत्र नसल्याचे व त्यासाठी सक्षम न्यायालयातून दाद मागणे जरूरीचे असल्याचे मत तहसीलदार यांनी त्यांचे आदेशामध्ये नोंदविले असल्याचेही दिसते. असे असूनही त्यांचे अंतिम आदेशामध्ये मात्र मागणी केल्याप्रमाणे नकाशातील रस्ता खुला करून देणेचा आदेश न करता गट क्र. ८०७, ८१६ व ८१७ मधील वहिवाटीचा बैलगाडीचा रस्ता आडविल्याचे दिसून आल्यामुळे खुला करून देणेचा आदेश पारित केला असल्याचे दिसते. तथापि स्थळपाहणी पंचनाम्यामध्ये मात्र सदर वहिवाटीचा बैलगाडीचा रस्ता अडविला असल्याची वस्तुस्थिती दिसून आली याबाबत कोणतेही निरीक्षण नोंदविले असल्याचे दिसून येत नाही. असे असूनही मुख्य मागणीप्रमाणे नकाशात नमूद शासकीय रस्ता खुला करून मिळण्याची मागणी असताना देखील तहसीलदार, जत यांनी सदर मागणीच्या बाहेर जाऊन वहिवाटीचा म्हणून बैलगाडीचा असलेला रस्ता खुला करून देणेचा आदेश पारित केलेला आहे.

३१) सदरची बाब सकृतदर्शनी स्पष्टपणे हे दर्शविते की तहसीलदार, जत यांनी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांचा अर्ज निकाली न करता वहिवाटीचा म्हणून असलेला रस्ता खुला करणेचा आदेश स्थळपाहणी पंचनाम्यातील निरीक्षणांचे विपरीत जाऊन केला आहे. त्याचबरोबर प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी

त्यांचे अर्जासोबत दाखल केलेल्या गाव नकाशांचे देखील अवलोकन केले असता त्यामध्येही नकाशात दर्शविलेल्या शासकीय रस्त्यांची दिशा सोडून वेगळ्याच बाजूने रस्ता असल्याचे नकाशामध्ये दर्शविले असल्याचे दिसते. मात्र तसा रस्ता असल्याची बाब मात्र वादींनी दाखल केलेल्या गाव नकाशाचे प्रतीत दिसून येत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष नकाशात नमूद असलेला रस्ता सोडून दुसऱ्याच बाजूने रस्ता करणे कायदेशीर आहे किंवा कसे व तसा रस्ता खुला करून देणे कायदेशीर होईल किंवा कसे असा देखील महत्त्वपूर्ण प्रश्न उपलब्ध कागदपत्रांवरून न्यायालयाचे विचारासाठी उपस्थित होतो आहे व त्यांचा ऊहापोह संपरिक्षेदरम्यान होणे गरजेचे आहे. त्यासाठी उभय पक्षकारांना पुराव्याची संधी देणे गरजेचे आहे. मात्र उपलब्ध कागदपत्रांवरून तहसीलदार, जत यांनी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी नकाशातील रस्ता खुला करून मागितला असतानाही तो खुला करून देण्याची असमर्थता दर्शवून मागणी नसलेला वहिवाटीचा रस्ता खुला करून देणेचा आदेश सकृतदर्शनी अधिकार कक्षेबाहेर जाऊन केला असल्याचे दिसून येते.

३२) या सर्व बाबींचा विचार केला असता सकृतदर्शनी तहसीलदार, जत त्यांचेसमोरील प्रकरणामध्ये पारित केलेला आदेश हा मूळ मागणीचे विपरीत जाऊन पारित केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्याचबरोबर जर तहसीलदार, जत यांचे उपलब्ध कागदपत्रांवरून मागणी केलेला रस्ता खुला करून देता येत नाही व त्यासाठी पक्षकारांनी सक्षम न्यायालयात दाद मागणे जरुरीचे आहे असे मत झाले होते तर तसे निरीक्षण नोंदवून अर्ज निकाली करणे जरुरीचे होते. तथापि त्यांनी तसे न करता मूळ अर्जाचा मागणी विषय नसलेला रस्ता खुला करून देणेचा आदेश केला असल्याने तशा आदेशाचे आधारे जर प्रतिवादी क्र. १ ते ५ व ११ यांनी रस्ता करणेचा प्रयत्न केला तर वादी यांचे अपरिमित नुकसान होईल या वादींचे कथनात

मला सकृतदर्शनी तथ्य दिसून येते. त्यामुळे वादींनी त्यांचे लाभात तहसीलदार, जत यांनी पारित केलेल्या आदेशाचे वैधतेबाबत दाव्याचे संपरिक्षेदरम्यान ऊहापोह करणे गरजेचे असल्याचे व सकृतदर्शनी सदरचा आदेश चुकीचा असल्याचे दर्शवून दिले असल्याने वादीचे लाभात सकृतदर्शनी प्रकरण आहे असे माझे मत आहे.

३३) या सर्व कारणमिमांसेचे पार्श्वभूमीवर प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी सदर अर्जास घेतलेल्या हरकतींचा विचार केला असता गट क्र. ८०७ मधील सर्व पक्षकार वादींनी सामील केलेले नाहीत अशी जी हरकत घेतली आहे तिचा विचार केला असता वादी क्र. १ यांचे कुटुंबीय व वादी क्र. २ एवढेच धारक गट क्र. ८०७ च्या मिळकतीमध्ये समाविष्ट असल्याचे दिसते. त्याचबरोबर प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी तहसीलदार, जत यांचेकडे दाखल केलेल्या अर्जामध्ये केवळ वादी क्र. १ यांनाच पक्षकार केले असल्यामुळे व वादींनी सदर अर्जाचे कामी दिलेल्या आदेशास या दाव्याचे कामी आव्हान दिले असल्यामुळे वादी क्र. १ चे कुटुंबीय या दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार आहेत असे सकृतदर्शनी दिसून येत नाही. याऊपर आवश्यक पक्षकारांची बाधा दाव्यास आहे असे जरी गृहीत धरले तरी सदर कायदेशीर मुद्याचा ऊहापोह हा दाव्याचे संपरिक्षेदरम्यान होणार असल्यामुळे त्याची बाधा प्रस्तुत तूर्तातूर्त मनाईचे अर्जावर आदेश पारित करताना येणार नाही असेही माझे मत आहे. त्यामुळे सदर हरकतीमध्ये मला सकृतदर्शनी तथ्य आढळून आले नाही.

३४) त्याचबरोबर प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी करण्यात येत असलेल्या रस्त्याशी त्यांचा कोणताही संबंध येत नसून सदरचा रस्ता हा शासकीय यंत्रणेमार्फत करण्यात येत असल्याची जी हरकत घेतली आहे तिचा विचार केला असता सदरची प्रस्तुत प्रतिवादींची कथने ही केवळ रचनात्मक असल्याचे माझे मत आहे. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनीच शासकीय रस्त्यावरील अडथळा दूर होऊन मिळणेसाठी

तहसीलदार, जत यांचेकडे अर्ज केलेला असताना व त्यामध्ये सदर रस्त्याची त्यांचे वहिवाटीसाठी आवश्यकता आहे असे स्पष्टपणे कथन केलेले असताना त्यांचा वाद विषयातील रस्त्याशी कोणताही संबंध नाही असे केलेले कथन सकृतदर्शनी न पटण्यासारखे आहे. त्यामुळे सदर हरकतीमध्ये मला तथ्य आढळून येत नाही.

३५) त्याचबरोबर वादी यांनी तहसीलदार यांचे आदेशाविरुद्ध पुनर्निरीक्षण अर्ज वरिष्ठ महसुली अधिकाऱ्यांकडे करणे गरजेचे होते व तसे न केल्यामुळे दावा व प्रस्तुत अर्ज चालणेस पात्र नाही अशी जी हरकत घेतली आहे तिच्या अनुषंगाने विचार केला असता मामलतदार कोर्ट ॲक्ट चे कलम ५ व २३ चे तरतुदीप्रमाणे महसुली अधिकाऱ्यांनी पारित केलेल्या आदेशाविरुद्ध दिवाणी न्यायालयात दाद मागता येईल याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाने **Mohammad Khan Rahim Khan Vs. Shankar Dhage & Anr.** reported in **2017 (3) Mh. L. J. 135.** या प्रकरणाचे पूर्वी **Rajendra Sheshrao Shendage Vs. Shobhabai Ravate reported in 2007 [3] Mh. L.J. 431** या प्रकरणाचे कामी दिलेल्या निर्णयावर भिस्त ठेवून मा. मुंबई उच्च न्यायालयाने खाली नमूद केल्याप्रमाणे निरीक्षण नोंदविले आहे.

> "7. I have gone through the provision of section 5 of the Mamlatdar's Courts Act. The proviso below sub-section [1] of section 5 of the said Act empowers the Mamlatdar to refuse to exercise the power under the said provision if it appears to him that such a case can be more suitably dealt with by the Civil Court. Though there is a revision provided under section 23 of the said Act to challenge the order passed by the Mamlatdar under section 5, the Act nowhere attaches finality either to the order passed under section 5 by the Mamlatdar on merits or to the order passed

in revision under section 23 of the said Act. In the absence of such finality being attached to the order passed under the Act, the jurisdiction of the Civil Court can not be held to be impliedly barred merely because the Act provides a separate machinery for getting the grievance redressed. The ouster of the plenary jurisdiction of Civil Court can not be readily interfered and such jurisdiction remains intact and available to be exercised either against the order under section 5 or against the order of revision under section 23 of the said Act."

"8. The learned counsel appearing for the parties could not bring to my notice any express provision creating bar of jurisdiction of the Civil Court to entertain, try and decide the suit challenging either the order passed under section 5 or under section 23 of the Mamlatdar's Courts Act. In a given case, a Civil Court may refuse to grant relief on the ground that the remedy of revision under section 23 of the said Act is not exhausted, but that is not the mandate which the Civil Court is required to observe. The lower Appellate Court has, in terms, recorded the finding that when the order passed by the Mamltadar is without following the procedure, it cannot come in the way of the Civil Court to decide the substantive rights of the parties. The view taken can not be faulted with. The substantial questions of law at serial Nos. [a] and [b] are, therefore, answered accordingly."

३६) सदर न्यायनिर्णयाचा विचार केला असता प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचेवतीने प्रस्तुतचा दावा व अर्ज चालविण्याचे अधिकारक्षेत्र या न्यायालयास नाही या त्यांचे कथनामध्ये मला सकृतदर्शनी तथ्य आढळून येत नाही.

३७) प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी जरी दावा मिळकतीमधील रस्ता हा शासकीय यंत्रणा करीत असल्याचे प्रतिपादन केले असले तरी प्रतिवादी क्र. ११ ही सार्वजनिक स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने तिने तिची बाजू या प्रकरणी हजर राहून मांडणे गरजेचे होते. तथापि दावेचे समन्स व प्रस्तुत अर्जाची नोटीस बजावणी होऊनही प्रतिवादी क्र. ११ हिने प्रस्तुतचे दाव्यात हजर राहून त्यांची बाजू मांडण्याची दक्षता घेतलेली नाही. त्यामुळे वादींनी प्रतिवादी क्र. ११ बाबत केलेली सर्व कथने विनाआव्हानीत राहिली आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. ११ ही कायदेशीर प्रक्रियेने दावा मिळकतीमधून रस्ता करण्याचा प्रयत्न करीत आहे ही प्रतिवादी क्र. १ ते ५ यांची कथने सकृतदर्शनी स्वीकारण्यास पात्र नाहीत असे माझे मत आहे. प्रतिवादी क्र. ११ यांनी दाव्याचे कामी हजर होऊन कैफियत व प्रस्तुत अर्जास म्हणणे देण्याचे टाळले असल्यामुळे वादींनी कथन केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ११ कडुनही वादींचे दावा मिळकतीतून रस्ता करण्याचा प्रयत्न होत असलेचे व त्यांचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा होत असल्याचे सकृतदर्शनी निर्धारण्यास कोणताही प्रत्यवाय नाही असे माझे मत आहे. त्यामुळे वादींनी प्रतिवादी क्र. ११ चे बाबतीतही सकृतदर्शनी प्रकरण दर्शवून दिले आहे असे माझे मत आहे.

३८) त्याचबरोबर प्रतिवादी यांनी शासनास पक्षकार केले नाही अशी जी हरकत घेतली आहे तिचा विचार केला असता सदरची बाब ही दाव्याच्या संपरिक्षेदरम्यान विचारात घ्यावयाची बाब असल्याने प्रस्तुत अर्जाचे निर्णयाकामी

त्याची बाधा येणार नाही. वादाकरिता जरी सदर हरकतीचा विचार केला असता मामलतदार कोर्ट ॲक्टचे कलम २६ प्रमाणे प्रस्तुत कायद्याखाली आदेश पारित करणाऱ्या दाव्याचे कामी पक्षकार करता येणार नाही अशी स्पष्ट तरतूद नमूद आहे. या कारणामुळेही सदर हरकतीमध्ये मला तथ्य आढळून येत नाही.

३९) या सर्व पार्श्वभूमीवर प्रतिवादी क्र. १ ते ५ व ११ यांनी तहसीलदार, जत यांनी वर नमूद केल्याप्रमाणे रस्ता प्रकरणाचे कामी केलेल्या आदेशाच्या आधारे जर दावा मिळकतीमधील वहिवाटीचा म्हणून असणारा रस्ता पूर्ण करून घेतला तर नकाशातील अस्तित्वात असणारा रस्ता व वहिवाटीचा रस्ता असे दोन रस्ते वाद मिळकतीतून निर्माण होण्याची शक्यता या प्रकरणात नाकारता येत नाही. त्याचबरोबर नकाशातील नमूद रस्ता खुला करून घेण्यासाठी विहित कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब न करताच जर प्रतिवादी क्र. १ ते ५ व ११ यांनी तहसीलदार, जत यांच्या आदेशान्वये वादींनी कथन केल्याप्रमाणे दावा मिळकतीमधून रस्ता करून घेतला तर वादींचे दावा मिळकतींचे विभाजन होऊन ती कसण्यास त्यांना अडचणीचे ठरेल या वादींच्या कथनात मला सकृतदर्शनी तथ्य आढळून येते.

४०) प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी त्यांचे कथनांचे समर्थनार्थ जी छायाचित्रे अभिलेखावर दाखल केली आहेत त्यांच्या दृष्टीने विचार केला असता प्रस्तुत प्रतिवादींनी सदरची छायाचित्रे ज्या छायाचित्रकाराने काढली आहेत त्याच्या सबळ पुराव्याखेरीज अभिलेखावर दाखल केली आहेत. त्यामुळे त्यांचे वैधतेचे अनुषंगाने सकृतदर्शनी टप्प्यावर कोणतेही मूल्यमापन करणे संयुक्तिक नाही. त्याचबरोबर सदर छायाचित्रांच्या वैधतेबाबत दाव्याच्या संपरिक्षेदरम्यान उभय पक्षकारांना पुराव्याची संधी देऊन अंतिम ऊहापोह होणार आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे

कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र. ११ यांनी शासकीय योजनेखाली रस्त्याचे काम सुरू केले आहे असे जे कथन केले आहे त्याच्या समर्थनार्थ प्रतिवादी क्र. ११ यांनी दाव्याचे कामी हजर राहून त्यांचे म्हणणे सादर करण्याची दक्षता न घेतल्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी यादी निशाणी क्र. ४४ सोबत अ.क्र. २ ते ५ कडे दाखल केलेल्या कागदपत्रांच्या सकृतदर्शनी वैधावैधतेबाबत देखील निष्कर्ष नोंदविणे अडचणीचे झाले आहे.

४१) प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचेवतीने भिस्त ठेवण्यात आलेल्या उपरोक्त नमूद केलेल्या **ग्रामपंचायत वि. बुधाराम** व इतर या प्रकरणातील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता सदर न्यायनिर्णयातील तथ्ये व प्रस्तुतच्या प्रकरणातील तथ्ये भिन्न असल्यामुळे त्यातील निरीक्षणे या प्रकरणास लागू होत नाहीत असे माझे विनम्र मत आहे. सदरच्या न्यायनिर्णयातील तथ्यांचे अवलोकन केले असता त्यामध्ये ग्रामपंचायतीच्या मालकीच्या रस्त्यावर त्या प्रकरणातील प्रतिवादींनी सिमेंट पाईप घालून केलेला अडथळा काढून देण्याबाबत तहसीलदाराने केलेल्या आदेशाचे वैधतेचे परीक्षण करताना मा. उच्च न्यायालय, पंजाब यांनी वादग्रस्त रस्ता हा ग्रामपंचायतीच्या मालकीचा असल्यामुळे खऱ्या मालकाचे विरुद्ध मनाईचा आदेश देणे संयुक्तिक होणार नाही असे मत नोंदविले आहे. परंतु प्रस्तुतच्या प्रकरणात वादींनी तहसीलदार, जत यांना उपरोक्त नमूद रस्ता प्रकरणाचे कामी पारित केलेल्या आदेशाच्या वैधतेस मामलतदार कोर्ट ॲक्ट चे कलम ५ व २३ मधील तरतुदीअन्वये आव्हान देऊन तो बेकायदेशीर व चुकीचा असल्याचे हक्कज्ञापन होऊन मिळण्याकरिता व निरंतरचे मनाईसाठी कायदेशीर प्रक्रियेने प्रस्तुतचा दावा दाखल केला असल्यामुळे व प्रस्तुत अर्जाद्वारे रस्ता प्रकरणाचे कामी पारित केलेलया आदेशाचे अंमलबजावणीस अंतरिम मनाई मागितली असल्याने प्रतिवादींचे वतीने

भिस्त ठेवण्यात आलेल्या न्यायनिर्णयातील तत्व या प्रकरणात मनाई आदेश पारित करण्यासाठी कोणतीही बाधा आणणारे नाही असे माझे विनम्र मत आहे.

४२) या सर्व बाबींचा विचार केला असता सकृतदर्शनी प्रकरण वादींचे बाजूने आहे असे माझे मत आहे. न्यायाचे समतोलाचा विचार केला असताही वादींनी सकृतदर्शनी प्रकरण त्यांचे बाजूने असल्याचे दर्शवून दिल्यामुळे तो वादींचे बाजूने झुकणारा आहे. अशा परिस्थितीत वादींनी विनंती केल्याप्रमाणे त्यांचे हक्कात व प्रतिवादी क्र. १ ते ५ व ११ यांचे विरुद्ध तूर्तातूर्त मनाई आदेश दिला नाही तर तुलनात्मकदृष्ट्या वादींचे जास्त नुकसान व अपरिमित हानी संभवते. याउलट प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे विरोधात तूर्तातूर्त मनाई हुकूम दिल्यास त्यांचे कोणतेही नुकसान संभवत नाही. या सर्व कारणांचा विचार करून माझे असे मत आहे की, वादींचा नि. क्र. ५ कडील अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. या सर्व कारणांमुळे मुद्दा क्र.१ ते ३ ची उत्तरे होकारार्थी नमूद करून मुद्दा क्र. ४ चे उत्तरार्थ मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. वादींचा निशाणी क्र. ५ कडील तूर्तातूर्त मनाईचा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ५ व ११ अथवा त्यांचेतर्फे हक्क सांगणाऱ्या इतर कोणत्याही इसम वा एजंटांनी दाव्याचे कलम १ मध्ये चतुःसिमापुर्वक नमूद केलेल्या मौजे रेवनाळ, ता. जत, जि. सांगली येथील गट क्र. ८०७ याचे क्षेत्र हे. ४=१४ आर पोट खराब हे. ०=०६ आर आकार रू. २=३७ पै. मधील नकाशाप्रमाणे असणाऱ्या सरकारी रस्त्याचे क्षेत्र वगळून

उर्वरित असणाऱ्या मिळकतीवर असलेल्या वादींच्या कब्जे वहिवाटीस, विहित कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब केल्याशिवाय, प्रस्तुत दाव्याच्या अंतिम निकालापावेतो कोणत्याही प्रकारे हरकत वा अडथळा करू नये अशी त्यांना तूर्तातूर्त ताकीद देणेत येत आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ५ व ११ अथवा त्यांचेतर्फे हक्क सांगणाऱ्या इतर कोणत्याही इसम वा एजंटांनी तहसीलदार, जत यांनी क्र. जमीन /मामलेदार कोर्ट ॲक्ट ०५/एस. आर./१२/२०२० चे प्रकरणी दि. ०८/१०/२०२० रोजी पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी दावेच्या निकालापावेतो कोणत्याही प्रकारे करू नये अशी त्यांना तूर्तातूर्त ताकीद देणेत येत आहे.

४. अर्जाचा खर्च मूळ दाव्यात समाविष्ट करणेत यावा.

EKNATH KOYAPPA CHOUGALE
Digitally signed by EKNATH KOYAPPA CHOUGALE
Date: 2022.05.06 15:25:16 +0530

स्थळ:– जत
दि. २७/०४/२०२२

(एकनाथ को. चौगले)
(JO Code -MHSN2400)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जत

## <u>प्रमाणपत्र</u>

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस. ए. जमादार (लघुलेखक श्रेणी–III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | २७/०४/२०२२. |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | ३०/०४/२०२२. |
| आदेश अपलोड केलेली तारीख | ०६/०५/२०२२. |